# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक 14/01/2023 (शनिवार) सायंकाळ**

---

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत उमरेड ते गिरड रोडवरील चारगाव घोटाळी गावाजवळील चिचबिलीच्या झाडाजवळ येथे दिनांक १२/०१/२०२३ चे २३.३० ते दिनांक १३/०१/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विलास तेजराम धारणे, वय ३० वर्ष, रा. यांचे वडील मृतक नामे— तेजराम धारणे, वय ५४ वर्ष हे शेतातुन घरी येत असतांना कोणत्यातरी अज्ञात चारचाकी वाहनाने धडक देवुन अपघात करून पळुन गेला. फिर्यादीचे वडील मृतक यांना गंभीर दुखापत झाल्याने मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे अज्ञात चारचाकी आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४(अ) भादवी सहकलम १८४, १३४ (अ) (ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डोर्लीकर पोस्टे उमरेड मो. क्र. ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत झाडे बार बोर्ड समोर कोंढाळी येथे दिनांक १३/०१/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील अज्ञात आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून यातील पायदळ येत असलेल्या मृतक नामे— प्रमोद प्रसाद रामचंद्र शाहा, वय ४२ वर्ष, रा. इनरवा जि. बेतीया याला धडक मारून गंभीररित्या जखमी करून उपचारा दरम्यान त्याचे मरणास अज्ञात आरोपी चालक हा कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शेख वजिर कदीर, वय ३८ वर्ष, रा. हेटीपुरा वार्ड क्र. १, कोंढाळी ता. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवि. सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. अज्ञात आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक बारंगे मॅडम मो. नं. ८७८८७५८७४२ या करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील वटेघाट येथे दिनांक १३/०१/२०२३ चे २०.०० वा. ते २.१५ वा दरम्यान यातील आरोपी नामे— संतोष पांचाळ, वय ४० वर्ष, रा. वटेघाट ता. हिंगणा जि. नागपूर हा आपल्या पत्निला दारू पिवून मारझोड करीत असल्याने फिर्यादीने आरोपीस हटकले असता आरोपीने फिर्यादीस ''तु मध्ये कशाला आली'' या कारणावरून त्याच्या खिशातील दारूची बॉटल फिर्यादीचे डोक्याला मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ. उषा अनिल मसराम, वय ४८ वर्ष, रा. वटेघाट ता. हिंगणा जि. नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ६९६ प्रशांत काळे मो. क्र. ९८२२५४९६९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील कारला ते येनवा रोड येथे दिनांक १३/०१/२०२३ चे १०.०० वा. १०.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सुरेश उमराव कुमेरीया, वय ४२ वर्ष, रा. कारला ता. काटोल जि. नागपुर यांच्या भाच्याने गावातील आरोपीच्या मुलीसोबत लग्न केले नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्याचा भाचा दुध पोहचवुन मोटरसायकलने घरी जात असता कारला ते येनवा रोडवर आरोपी नामे— १) हरीचंद्र खरपुरीया २) नेहाल खरपुरीया दोन्ही रा. कारला ता. काटोल जि. नागपुर यांनी गाडी थांबवुन संगनमत करून फिर्यादीला म्हटले की ''तुझ्या भाच्याने माझे मुलीसोंबत लग्न का केले'' या कारणावरून फिर्यादीला आरोपीने फावडयाने छातीवर व उजवे पायाचे टोंगळयावर मारून जखमी केले व तसेच शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३४१, ३२४, ५०४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ५५० पवन वाघमारे मो. नं. ९८३४२८१४०१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**